DISTRICT AND SESSIONS COURT, JALNA
Survey No - 488, Bypass Road, Jalna 431203
Web-https://jalna.dcourts.gov.in/ Email - mahjaldc@mhstate.nic.in

जिल्हा न्यायालय जालना/संगणक/ निविदा/109/२०२६ दिनांक :-06/01/२०२६

जाहीर निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथील संगणक विभागात प्रस्थापित करण्यात आलेल्या युपीएस साठी खालीलप्रमाणे **बॅटरीज बायबॅक (जुन्या नादुरुस्त बॅटरीज देवून नवीन बॅटरीजच्या किंमतीतून जुन्या बॅटरीची सध्याची किंमत वजा करुन नवीन बॅटरी खरेदी करणे)**पध्दतीने खरेदी करावयाच्या आहेत.

अ. क्र.	तपशील	**बायबॅक पध्दतीने खरेदी करावयाच्या बॅटरीजची संख्या**	**बॅटरीची कंपनी**	**जुन्या नादुरुस्त बॅटरीज देवून नवीन बॅटरीजच्या किंमतीतून जुन्या बॅटरीची सध्याची किंमत वजा करुन नवीन बॅटरीची किंमत (By-Back) सर्व करांसहित**
१	२ केव्हीए न्युमरिक ऑनलाईन युपीएससाठी 12 V, 65 AH च्या बॅटरीज बायबॅक पध्दतीने नवीन बॅटरीज खरेदी करणे	०६	(Quanta (Amarraja) किंवा Exide)	
२	२ केव्हीए आर.एस पॉवर ऑनलाईन युपीएसच्या युपीएससाठी 12 V, 75 AH च्या बॅटरीज बायबॅक पध्दतीने नवीन बॅटरीज खरेदी करणे	०६	(Quanta (Amarraja) किंवा Exide	

इच्छुक पुरवठाधारकाने निविदा या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जालना यांचे नांवे अग्रेषित मोहरबंद लखोटयात दिनांक १९-०१-२०२६ रोजीपर्यत (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेपर्यत म्हणेजच सांयकाळी ६:०० वाजेपर्यत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या कार्यालयात सादर कराव्यात. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रकाचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

सदर निविदा/दरपत्रक लखोटयावर **" २ केव्हीए न्युमरिक ऑनलाईन युपीएससाठी 12 V, 65 AH आणि २ केव्हीए आर.एस पॉवर ऑनलाईन युपीएसच्या युपीएससाठी 12 V, 75 AH बॅटरीजचे दरपत्रके "** असा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे.

अटी व शर्ती

१. मोहरबंद/सीलबंद लखोटयावर **' २ केव्हीए न्युमरिक ऑनलाईन युपीएससाठी 12 V, 65 AH आणि २ केव्हीए आर.एस पॉवर ऑनलाईन युपीएसच्या युपीएससाठी 12 V, 75 AH बॅटरीजचे दरपत्रके "** असा ठळक अक्षरात उल्लेख करावा व ती ही जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथे सादर करावीत.

२. **दरपत्रकातील/ निविदेमधील नमूद दर हे सर्व करांसहित तसेच बसवून देणेसह आणि पडताळणीसह नमूद करावेत. तसेच दरपत्रकात बॅटरीजचा वॉरंटी कालावधी स्पष्ट नमूद करावा.**

३. निविदा मंजूर झाल्यानंतर व आदेश पारित झाल्यानंतर दरपत्रकात नमूद दराशिवाय कोणताही जास्तीचा दर आकारता येणार नाही.

४. निविदा मंजूर झाल्यानंतर व आदेश निर्गमित केल्यानंतर बॅटरीज युपीएसमध्ये प्रस्थापित करुन द्याव्या लागतील व त्याची पडताळणी करुन द्यावी लागेल. सर्व पडताळणी झाल्यावरच जिल्हा न्यायालयामार्फत सदरील देयकाची अदायगी करण्यात येईल. तसेच प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास कोणताही विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

५. नवीन बॅटरीज हया उक्त नमूद कंपनीच्या ओरिजनल (मूळ) कंपनीच्याच असाव्यात इतर कंपनीचे बॅटरीज बसविता येणार नाही. बॅटरीज हया दर्जेदार असावेत त्यात काही दोष उत्पन्न झाल्यास तो तात्काळ बदलून द्याव्या लागतील.

६. कोणतेही दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा हक्क जिल्हा न्यायालय खरेदी समिती जालना हे राखून ठेवीत आहे.

७. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

८. पुरवठा करण्याबाबतचे आदेश दिल्यानंतर बॅटरीज ७ दिवसाच्या आत जिल्हा न्यायालयास पुरवाव्या लागतील.

९. बॅटरीजची वॉरंटी कालावधीत बॅटरी निकामी झाल्यास ती बदलून देण्यासाठी पाठविणे किंवा परत मागवून घेणे याबाबतचा ट्रान्सपोर्ट खर्च जिल्हा न्यायालय करणार नाही. तो खर्च संबंधित पुरवठाधारक यांना करावा लागेल.

१०. बॅटरीजच्या वॉरंटी कालावधीत तक्रार नोंदविल्यानंतर ४८ तासांच्या आत पुरवठाधारकास बॅटरी बदलून नवीन बॅटरी द्यावी लागेल त्यासाठी कोणत्याही प्रकारची अतिरिक्त दर आकारता येणार नाही.

११. सदरहु दरपत्रकातील सुचना कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाने राखून ठेवले आहे.

१२. सदर करार होण्याच्या अगोदर कोणत्याही टप्यावर दरपत्रक रद्द करणे / बदल करणेचा अधिकार खरेदी सल्लागार समिती, जिल्हा न्यायालय जालना यांना राहील.

१३. पुरवठा आदेशानुसार पुरवठा न केल्यास किंवा अटीचे उल्लंघन केल्यास काणेत्याही टप्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय जालना यांना राहील.

१४. दरपत्रक लिफाफामध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत..
आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत, पॅनकार्डची प्रत, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

१५. सदरची जाहिरात जिल्हा न्यायालय जालनाच्या संकेतस्थळावर (https://jalna.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

१६. निविदाधारकांनी दरपत्रके/ निविदा जिल्हा न्यायालय जालना येथे दिनांक १९-०१-२०२६ रोजीपर्यत (सुटीचे दिवस) सायंकाळी ६-०० वाजेपर्यत पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

आदेशावरुन

06/1/26

प्रबंधक

जिल्हा न्यायालय जालना.

दिनांकः- ०६/०१/२०२६